# Vidya warta®

International Multilingual Research Journal
Issue-23, Vol-02 January to March-2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

14) THE IMPACT OF SOCIAL MEDIA ON THE STUDENTS: A CASE ......
Dr. P. Srinivasulu || 73

15) Digital games and impact on different ages
SOHRAB ZEINALI || 81

16) The present paper highlights the need and significance of the......
Dr. Anita Singh, Dr. Bharti Dogra, || 87

17) लोकसाहित्याचे संशोधन
प्रा.डॉ. किरण नामदेव पिंगळे, || 94

18) माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या बहुविध आवडीचे चिकित्सक अध्ययन
डॉ. राजेश चंदनपाट || 96

19) बालकामगार प्रथेचे / समस्याचे परिणाम
प्रा कन्नाडे ममता कार्तिक || 99

20) शोषणतत्वांचे निर्मूलन आणि सामाजिक पुन:निर्मितीसाठी .....
कुणाल रामटेके, || 104

21) भारतीय राष्ट्रपती निवडणुकीचे विश्लेषण
प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव || 110

22) यादव कालीन माहूर एक ऐतिहाकि आभ्यास
प्रा. डॉ. दत्ता यु. जाधव || 113

23) अज्ञात—अज्ञेय तत्त्व
डॉ.सुनील अंबादासपंत काळमेघ. || 116

24) शोध की दृष्टि और उद्देश्य का संभरण
डॉ. आरिफ जमादार || 119

25) उच्च प्राथमिक स्तर की सामाजिक अध्ययन विषय की पाठ्यपुस्तकों.....
स्वीकृति शर्मा || 122

26) मध्यप्रदेश की राजनीति में मुस्लिम अल्पसंख्यक .....
तबस्सुम || 127



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012 UGC Approved Sr.No.62759 Vidya ® Jan. To March 2018
ISSN: 2319 9318 Issue-23, Vol-02 0110

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR



५) महानुभाव एक आवाहन — प्रा. पुरुषोत्तम नागपुरे

६) लीळाचरित्र एकांक : डॉ. मदन कुलकर्णी (विजय प्रकाशन)

७) केंद्र हरवत चाललेल्या वर्तुळाचा परीघ — प्रा. डॉ. सुनील अभिमान अवचार

८) उत्तरयात्री — प्रा. पुरुषोत्तम नागपुरे

९) महानुभाव एक दृष्टिक्षेप — अनिल शेवाळकर

१०) सूत्रपाठ — संपादक : सुदाम पंडित

११) महानुभाव आणि त्यांचे वाङमय — श. गो. तुळपुळे (व्हीनस प्रकाशन)

१२) महानुभाव गद्य — श. गो. तुळपुळे (व्हीनस प्रकाशन)

१३) दलित लेखिकांच्या कथा — डॉ. जया जितेंद्र कदम (लक्ष्मी बुक पब्लिकेशन, सोलापूर)

१४) दलित स्त्री आंदोलन तथा साहित्य : अस्मितावाद से आगे — बजरंग बिहारी तिवारी (दलित स्त्रीवाद विशेषांक — स्त्रिकाल)

१५) समकालीन हिंदी दलित साहित्य : एक विचार विमर्श — सुरजपाल चौहान (विणा प्रकाशन)

१६) दलित साहित्य का समाजशास्त्र — हरिनारायण ठाकूर ( भारतीय ज्ञानपीठ, नवी दिल्ली)

१७) स्त्री जाणिवेच्या वरवरच्या कथा — विद्युत भागवत (लोकसत्ता, दिनांक ☐ मार्च २०१६)

१८) दलित स्त्रियांच्या आत्मभानाची वाटचाल — डॉ. अश्विनी धोंगडे (लोकसत्ता दिनांक २६ सप्टेंबर २०१५)

19) दलित कहानी मे प्रतिरोध के स्वर — डॉ. गीता कुअम्मा सी

२०) हिंदी दलित साहित्य का विकास — डॉ. प्रमोद कोप्रान (वाणी प्रकाशन)

# भारतीय राष्ट्रपती निवडणुकीचे विश्लेषण

**प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

भारतीय शासन व्यवस्थेतील राष्ट्रपती हे एक महत्वाचे पद आहे. भारताचा प्रथम नागरिक राष्ट्रपती असतो. भारताचा प्रथम नागरिक कोण असावा ? या बाबतचे विवेचन भारतीय राज्यघटनेत आहे. प्रस्तुत लेखात २०१७ साली झालेल्या राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीवर प्रकाश टाकण्यात आला. ज्यात राष्ट्रपती विषयी राज्यघटनेतील तरतुद, राष्ट्रपतीच्या पात्रता, कार्यकाळ, शपथविधी, निवड प्रक्रिया, निर्वाचक मंडळ, मत मूल्य, आजपर्यंत कोण-कोण राष्ट्रपती झाले. त्यांचे वैशिष्ट्ये काय? रामनाथ कोविंद यांचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचा कार्यकाळ जूले २०१७ मध्ये संपणार होता. तत्पूर्वीच पुढचा राष्ट्रपती निवडला जावी अशी तरतूद राज्यघटनेत आहे. साधारणपणे राष्ट्रपती पदासाठी सत्ताधारी पक्षाकडून दिलेलाच उमेदवार निवडून येतो. राष्ट्रपती पदाचा उमेदवार देताना सत्ताधारी व विरोधक त्या उमेदवाराची प्रतिभा, क्षमता, जात इत्यादीचे राजकीय इनकॅशमेंट करुन घेत असतात. परंतू त्या पदाला शोभेल असाच उमेदवार दिला जातो हे मात्र नक्की. १७ जूले २०१७ रोजी १४ वे राष्ट्रपती निवडण्यासाठी निवडणुक झाली. या निवडणुकीत रामनाथ कोविंद आणि मीरा कुमार हे दोन प्रतिस्पर्धी होते. यांच्या निवडणुकीचा निकाल २० जूले २०१७ साली लागला. या निवडणुकीत रामनाथ कोविंद यांचा विजय झाला. रामनाथ कोविंद हे या देशाचे १४ वे राष्ट्रपती बनले.

रामनाथ कोविंद यांचे नाव जेंव्हा भारतीय जनता पक्षाने राष्ट्रपती पदाचा उमेदवार म्हणून घोषित केले तेंव्हा भारतीय राजकारणाच्या प्रसार माध्यमे, whatsup, facebook इत्यादीतून बरीच उलटसुलट चर्चा झाली. या चर्चेचा मुख्य केंद्रबिंदू म्हणजे भारतीय जनता पक्षाने रामनाथ कोविंदाचेच नाव राष्ट्रपती पदासाठी का दिले? यातही प्रामुख्याने ते दलित जातीतील आहेत. दलितांच्या मताला आकर्षित करुन २०१९ ची लोकसभा निवडणुक जिंकण्याचा भारतीय



Scanned by CamScanner

जनता पक्षाचा डाव आहे अशीच चर्चा अधिक होती. या चर्चेतील वास्तवता समजून घेण्यासाठी रामनाथ कोविंद यांचा अल्प परिचय जाणून घेवू.

रामनाथ कोविंद यांचा जन्म १ ऑक्टोबर १९४५ ला उत्तरप्रदेशातील कानपूर मधील पराऊख या गावात दलित कुटूंबात झाला. तोही कोळी जातीत. याचा अर्थ रामनाथ कोविंद हे दलित आहेत. परंतु येथे एक प्रश्न निर्माण होतो की, रामनाथ कोविंद हे फक्त दलित आहेत, म्हणूनच भारतीय जनता पक्षाने त्यांना राष्ट्रपती पदाची उमेदवारी दिली का ? या प्रश्नाचे उत्तर त्यांचा सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व राष्ट्रीय क्षेत्रातील योगदान जाणून घेतल्यावरच मिळेल. त्यामुळे ते जाणुन घेण्यासाठी गुगलच्या साह्याने रामनाथ कोविंद यांची प्रोफाईल अभ्यासली. त्यावेळेस लक्षात आले की, रामनाथ कोविंद हे UPSC सारखी महत्वाची परिक्षा पास झालेत. वकिलीच्या क्षेत्रात त्यांनी स्वत:च्या करिअरचा प्रारंभ केला. १९७७ ते १९७९ या काळात दिल्ली उच्च न्यायालयात ते केंद्र सरकारचे वकिल होते. १९८० ते १९९३ या प्रदिर्घ काळात सर्वोच्च न्यायालयातील केंद्र सरकारच्या स्टँडिंग कौंसिलवर काम केले. १९७८ मध्ये ते सर्वोच्च न्यायालयाचे अॅडव्होकेट ऑन रेकॉर्ड बनले. दिल्ली उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात १६ वर्ष वकिली केली.

रामनाथ कोविंद राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक जूने व महत्वाचे कार्यकर्ते व नेते आहेत. त्यांनी आपल्या गावातील वडिलोपार्जित घर राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी दिले. १९९१ साली त्यांनी रितसर भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. १९९८ ते २००२ या काळात भारतीय जनता पक्षाच्या दलित मोर्चाचे अध्यक्षपद सांभाळले. ते आखिल भारतीय कोळी समाजाचे अध्यक्ष राहिले. भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते पदाची जबाबदारी सांभाळली. भाजपाच्या तिकीटावर उत्तर प्रदेशातील घटमपूर आणि भोगनीपूर या मतदार संघातून विधानसभा निवडणूक लढवली. परंतू दोन्ही वेळेस त्यांचा पराभव झाला. १९९४ ला त्यांची राज्यसभेचे खासदार म्हणून नियुक्ती झाली. १९९४ ते २००६ अशी सलग १२ वर्ष ते राज्यसभेचे सदस्य होते. या काळात त्यांनी अतिशय महत्वाच्या समित्यावर सक्रियपणे काम केले. ऑगस्ट २०१५ रोजी बिहारचे राज्यपाल म्हणून त्यांची नियुक्ती झाली. याशिवाय कोविंद यांनी युनोच्या आमसभेत ऑक्टोबर २००२ मध्ये भाषण केले. विविध राष्ट्रांना भेटी दिल्या. लखनौतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ आणि कलकत्याच्या आयआयएम मध्ये ते बोर्ड सदस्य होते.

एवढा प्रदीर्घ व अनुभव संपन्न रामनाथ कोविंद यांचे व्यक्तिमत्व आहे. तसेच अत्यंत गरिबी व हालाखीच्या परिस्थितीतून त्यांनी आपले शैक्षणिक, सामाजिक व राजकीय जीवन घडवले. तसेच त्यांची भारतीय संविधानावर निष्ठा आहे. या देशातील गरिबांच्या जीवनात प्रगतीचा सुर्य उगवावा या भावनेने आपण काम करणार असल्याचे सांगितले, ते ही मानवतावादी दृष्टीकोनातून यावरुन रामनाथ कोविंद यांची राष्ट्रपती पदावर भारतीय जनता पक्षाने का निवड केली या प्रश्नाचे त्यांच्या उमेदवारीबाबत आणि निवडी संदर्भात विरोधकांनी घेतलेल्या आक्षेपांचे उत्तर मिळते.

राष्ट्रपती पदाची निवडणूक हा सर्वच भारतीयांच्या जिव्हाळ्याचा व उत्सुकतेचा मुद्दा असतो. तसेच काही प्रश्न निर्माण करणाराही असतो. भारतीय राष्ट्रपती पदासाठीच्या पात्रता काय ? त्याची निवड कशी होते ? त्याला कोण मतदान करते ? या सर्व प्रश्नांबाबत जूलै २०१७ मध्ये प्रसारमाध्यमांनी बरीच चर्चा केली. या ठिकाणी वरील प्रश्नांना समजून घेतल्याशिवाय याविषयाला पूर्णत्व येणार नाही. त्यामुळे त्याचे विश्लेषण केले.

भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या भागातील कलम ५२ ते ७८ मध्ये केंद्रीय कार्यकारी मंडळाची तरतूद आहे. या केंद्रीय कार्यकारी मंडळात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधानासह भारताचे महान्यायवादी यांचा समावेश होतो. या देशातील प्रत्येक व्यक्तिला भारताचा राष्ट्रपती होता येते. त्यासाठी त्याने वयाची ३५ वर्ष पूर्ण केलेली असावीत. तो भारताचा नागरिक असावा ती व्यक्ती केंद्र व घटकराज्य किंवा इतर ठिकाणी लाभाच्या पदावर नसावी. ती व्यक्ती संसद आणि घटकराज्याच्या विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाची सदस्य नसावी. याशिवाय उमेदवार म्हणून त्यांच्या नावास ५० संसद किंवा विधानसभा सदस्यांनी पुरस्कृत व अनुमोदीत करावेत. १५ हजार रुपये अनामत रक्कम भरावीत ज्या उमेदवाराला १/६ मते मिळणार नाहीत. त्यांची अनामत रक्कम जप्त होते. भारतात राष्ट्रपती पदाच्या निवडणुकी संदर्भात लोकांत बरेच कुतुहल असते. राष्ट्रपतींची निवड कशी करावी या संदर्भात संविधान सभेत बरीच चर्चा झाली. चर्चेअंती राष्ट्रपतीची निवड अमेरिकन राष्ट्राध्यक्षाप्रमाणे थेट जनतेकडून न करता लोकप्रतिनिधीमार्फत करण्याचे ठरवले. राष्ट्रपतीची निवड अप्रत्यक्ष पध्दतीने ठरवण्याचे कारण की, भारतीय राज्यघटना राष्ट्रपतीचे पद हे नामधारी आहे. तो नामधारी शासनप्रमुख आहे. वास्तविक प्रमुख पंतप्रधान आणि मंत्रीमंडळ असते. अशावेळी राष्ट्रपतीची निवड प्रत्यक्ष जनतेकडून करुन त्यास काहीही अधिकार न देणे उचित नाही. याशिवाय या पदावरील नामधारी म्हणून एकाच व्यक्तीची निवड केली जाते. तिच्या निवडणुकीत प्रत्यक्ष पध्दतीत होणारा प्रचंड खर्च टाळावा. तसेच भारतासारख्या विशाल लोकसंख्या, विविधता, मोठा भूप्रदेश असणाऱ्या देशात ही निवडणूक फार गुंतागुंतीची झाली असती. या सर्व गुंतागुंतीस खर्चास टाळता यावे. या निवडणुकीतील गांभीर्य आणि पदाची प्रतिष्ठा



Scanned by CamScanner

राखावी म्हणून अप्रत्यक्ष पध्दतीचा स्विकार करण्यात आला.

राष्ट्रपतीची निवड राज्यघटनेतील कलम ५४, ५५ आणि १९५२ च्या राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निवडणुका कायद्यात स्पष्ट करण्यात आली. राष्ट्रपतीची निवड लोकप्रतिनिधी कडुन करण्याचे ठरवण्यात आले असले तरी या निवडणुकीत भारतातील सर्वच लोकप्रतिनधींना ती संधी नाही. राष्ट्रपतीच्या निवडणूकीत मतदान करणाऱ्या मतदारांच्या समुहास इलेक्टोरल कॉलेज म्हणतात. या इलेक्टोरल कॉलेजमध्ये घटकराज्य व केंद्रशासीत प्रदेश (फक्त दिल्ली आणि पॉंडेचेरी) विधानसभा आणि संसदेच्या दोन्ही सभागृहातील (लोकसभा व राज्यसभा) निवडून आलेल्या सभासदांचा समावेश होतो. राष्ट्रपती निवडणुकीत विधान परिषदेतील सभासदांना मतदानाचा अधिकार नाही. या निवडणूकीत मतदार हा लोकप्रतिनिधी असतो. या लोकप्रतिनिधीच्या मताचे एक मूल्य ठरलेले असते. या मूल्याची सांगड त्या राज्यातील लोकसंख्येशी घातली जाते. १९७१ च्या लोकसंख्येच्या आधारावर खासदार आणि राज्यातील विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य ठरवले जाते. २०२६ नंतरच्या पहिल्या जनगणनेची आकडेवारी प्रकाशित होत नाही. तोपर्यंत खासदारांच्या आणि राज्यातील आमदारांच्या मताचे मूल्य ठरवण्यासाठी १९७१ च्या लोकसंख्येचा आधार घेतला जाईल अशी तरतूद २००१ साली झालेल्या ८१ व्या घटनादुरुस्तीनूसार करण्यात आली. त्यानुसार विचार केल्यास एका खासदाराच्या मताचे मूल्य ७०८ आहे. पण आमदाराच्या मताचे मूल्य राज्यनिहाय बदलते. उदा : उत्तरप्रदेश-२०८, महाराष्ट्र-१७५, राजस्थान-१२९, मध्यप्रदेश-१३१, बिहार-१७३, आंध्रप्रदेश-१५९, पश्चिम बंगाल-१५१, तामिळनाडू-१७६, झारखंड-१७६ इत्यादी.

राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीसाठी मतदान करणाऱ्या मतदाराच्या मताचे मूल्य ठरवण्याचे एक सूत्र आहे. ज्याची मांडणी खालीलप्रमाणे करता येईल.

१) संसदेच्या प्रत्येक सदस्याच्या मताचे मूल्य ठरवणारे सूत्र :

निवडून आलेल्या विधानसभा सदस्यांची एकूण मते = संसदेत निवडून आलेल्या सदस्यांची संख्या.

२) घटकराज्यातील विधानसभा सदस्याच्या मताचे मूल्य =

घटकराज्याची लोकसंख्या विधानसभेतील निवडून आलेली सदस्या संख्या x १ / १०००

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत वरील दोन सुत्रांचा आधार घेवून मतदारांचे मूल्य ठरवले जाते. या निवडणुकीत क्रमदेय मतदान पध्दतीनुसार मतदान होते. ज्याची तरतूद १९७४ च्या राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निवडणुक नियमात करण्यात आली. यानुसार मतदाराच्या मतदान पत्रिकेवर निवडणूक चिन्ह नसते. मतपत्रिकेवर उमेदवाराचे नाव आणि त्यासमोर द्यावयाचा पसंतीक्रमासाठी रकाना असतो. मतदाराने उमेदवाराच्या नावासमोर १,२,३ असा पसंतीक्रम लिहावयाचा असतो. तो ही फक्त आकड्यात अक्षरात नाही. अक्षरात लिहिलेल्या क्रमांकाचे मतदान बाद समजले जाते. मतदाराची मतमोजणी करताना पहिल्या पसंतीचे मतदान मोजले जातात. या पहिल्या पसंतीत उमेदवारास जर आवश्यक मतदान मिळाले तर त्यास विजयी घोषीत केले जाते.

२०१७ ला भारतात झालेली राष्ट्रपती पदाची निवडणूक ही १५ वी होती. यापूर्वी १९५२, १९५७, १९६२, १९६७, १९६९, १९७४, १९७७, १९८२, १९८७, १९९२, १९९७, २००२, २००७ आणि २०१२ या काळात राष्ट्रपतीच्या निवडणूका झाल्या. या निवडणुकी (२०१७) लोकसभेचे ५४३ व राज्यसभेचे २३३ असे एकूण ७७६ खासदार होते. तर ३१ विधानसभांचे ४१२० आमदार होते. ७७६+४१२०=४८९६ एकूण मतदार या निवडणुकी होते. २०१७ च्या राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी १७ जूले रोजी मतदान झाले. ज्याचा निकाल २० जूले रोजी जाहीर करण्यात आला. या निवडणूकी ७७६ खासदारांपैकी ७६८ खासदारांनी मतदान केले. तर ४१२० आमदारांपैकी ४०८३ आमदारांनी मतदान केले. त्यापैकी ७४७ खासदार आणि ४०२७ आमदारांचे मत वैध ठरले. या सर्व मताचे १०६९३५८ मतमूल्य होते. या सर्व मतमूल्यांपैकी रामनाथ कोविंद ७ लाख २ हजार ४४ मते रामनाथ कोविंद यांना मिळाले. ज्याचे प्रमाण ६५.६५% होते. तर मीराकुमार यांना ३ लाख ६७ हजार ३१४ मते मिळाली ज्याचे प्रमाण ३४.३५% होते. या निवडणुकीत रामनाथ कोविंद यांचा विजय झाला. लोकसभेत भाजपास स्पष्ट बहुमत होते. उत्तरप्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत भाजपास मिळालेल्या विजयामुळे राज्यसभेतील त्याचे बलाबल वाढले. तसेच अधिकाधिक राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार असल्यामुळे रामनाथ कोविंद यांचा विजय झाला. तो निवडणूकीपूर्वीच पक्का होता. निवडणूक प्रक्रियेतून त्याच्यावर २० जुले रोजी शिक्कामोर्तब करण्यात आले.

डॉ.राजेंद्रपसाद ते रामनाथ कोविंद असा राष्ट्रपतीचा प्रवास आहे. डॉ.राजेंद्रप्रसाद भारताचे पहिले व सर्वाधिक काळ या पदावर विराजमान असणारे राष्ट्रपती होते. त्यानंतर डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन हे पहिले उपराष्ट्रपती आणि दूसरे राष्ट्रपती बनले. ५ सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिवस आहे. संपूर्ण भारतात तो शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. डॉ.झाकीर हुसेन हे देशातील पहिले मुस्लिम राष्ट्रपती होते. राष्ट्रपती पदी बिनविरोध निवडुन येणारे ते पहिले व आजपर्यंतच्या इतिहासातील एकमेव राष्ट्रपती होय. ग्यानी झेल सिंग यांच्या काळातच ऑपरेशन ब्लू स्टार व इंदिरा गांधीची हत्या झाली. आर.वेंकटरामण या राष्ट्रपतीच्या काळात राजीव गांधी, व्ही.पी.सिंग, चंद्रशेखर आणि



Scanned by CamScanner

पी.व्ही.नरसिंहराव असे एकूण चार पंतप्रधान देशाला लाभले. के.आर.नारायणन हे देशाचे पहिले दलित राष्ट्रपती होय. डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम हे लोकांचे राष्ट्रपती म्हणून ओळखले जातात. मिसाईल मॅन अशी त्यांची ओळख आहे. देशाच्या क्षेपणास्त्र कार्यक्रमाचे शिल्पकार ही त्यांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ओळख आहे. श्रीमती प्रतिभा देविसिंग पाटील या देशातील पहिल्या महिला राष्ट्रपती होय. तदूनंतर प्रणव मुखर्जी हे देशाचे राष्ट्रपती बनले. ते राष्ट्रपती पदावर विराजमान होणारे पहिले बंगाली व्यक्ती होय. भारतीय राजकारणातील स्टेट्समन अशी त्यांची ओळख आहे. रामनाथ कोविंद हे देशाचे दुसरे दलित राष्ट्रपती बनले.

अशा प्रकारे जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या देशातील पहिल्या नागरिकांची व घटनात्मक शासनप्रमुख असणाऱ्या व्यक्तिंची निवड होते. या लेखामुळे राष्ट्रपती पदाच्या निवडीतील अनेक बारकावे समजतील. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीचे भारतीय शासन व लोकशाहीतील महत्व लोकांच्या लक्षात येईल. याहीपेक्षा डॉ.राजेंद्रप्रसाद ते रामनाथ कोविंद पर्यंतच्या राष्ट्रपती पदावर विराजमान झालेल्या प्रमुख राष्ट्रपतीपदाचे विशेषत्व कळेल. रामनाथ कोविंद हे फक्त दलित आहेत. म्हणून त्यांना राष्ट्रपती पदाची उमेदवारी जरी दिली असेल तरी त्यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान, त्यांची क्षमता त्या पदासाठी योग्य आहे. तसेच या पदाची प्रतिष्ठा व गरिमा वाढवण्या इतपतची क्षमता व प्रतिभा त्यांच्याकडे आहे.

संदर्भ :

१) इंडिया टुडे - ५ जूलै २०१७
२) इंडिया टुडे - ३ मे २०१७
३) इंडिया टुडे - २५ ऑक्टोबर २०१७.

□□□

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI ... DEGLOOR COLLEGE, DEGLOOR ... Dist.Nanded ... SOCIETY'S

22

# यादव कालीन माहूर एक ऐतिहासिक आभ्यास

प्रा. डॉ. दत्ता यु. जाधव
श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहुर, जी. नांदेड.

***********

यादव राजे मथूरा व द्वारका येथून स्थालांतरीत झालेले होते. असा उल्लेख हेमांद्री यांच्या व्रतखंडात आढळतो. सूबाहू यादव वंशाचा स्वतंत्र राजा होता. सुबाहू राजाचा पुत्र दृढप्रहार यानी दख्खनाकडे स्थालांतर केले होते. दख्खनात त्यानी चंद्रादित्यपूर येथे यादव घराण्याची स्थापना केली होती. सेऊणचंद्र यादव वंशातील दुसरा राजा होता. त्याच्या नावावरुन प्रदेशाला 'सेऊणदेश' असे नाव पडल्याचे उल्लेख हेमांद्री व्रतखंडात करतो. औरंगाबाद जिल्हाचा उत्तर व खानदेश भागात यादवाची प्रारंभिक सत्ता होती. या भागाला प्राचीन काळात 'सेऊणदेश' असे नाव होते. प्रारंभिक काळात यादव राष्ट्रकुटाचे मांडलिक होते. यादव राजे स्वतःला श्रीकृष्णाचे वंशज मानतात. भिल्लम पाचवा यादव राजाने कल्याणीच्या चालुक्याचा पराभव इ.स. ११८७ ते इ. स. ११९१ ला केला होता. यानी यादवाची स्वतंत्र सता स्थापन केली होती. भिल्लम पाचवा यादव घराण्याचा संस्थापक राजा होता. त्यानी नगराची स्थापना केली होती. देवगिरीला यादव राजसत्तेची राजधानी बनवली होती.

माहूर व परीसरावर परमार राजा भोजाची सता होती. परमार राजा भोज नंतर जगदेव परमार माहूरचा राजा झाला होता. सिंघणदेव दुसरा यादव वंशातील पराक्रमी राजा होता. त्यांनी यादव सत्तेचा इ.स.१२१० ते इ.स. १२४० मध्ये विस्तार केला होता. खोलेश्वराच्या आबेंजोगाई शिला लेखात तसेच हेमांद्री राजप्रशस्तीत नमूद केल्याप्रमाणे सिंघणदेवाने माळव्याच्या अर्जुनदेव परमार राजाचा पराभव केला होता. माहूर व परीसरावर यादवापूर्वीच्या काळात राष्ट्रकुट राजानंतर जगदेव परमार राजाची राजसता होती. जगदेव परमार राजाला सिंघणचा सेनापती खोलेश्वरानी पराभव केला होता. यादव राजा सिंघणच्या काळात माहूरवर यादवाची सता स्थापन झाली होती.

माहूरचा कारभार सिंघणचा सेनापती खोलेश्वरानी सांभाळला होता. माहूर नगरात असलेल्या देवदेवश्रीच्या मंदिराच्या बाजूला खोलेश्वराचे मंदीर आहे. यावरुन सिध्द होते. खोलेश्वरानी



Scanned by CamScanner